# हसूरे

१८ (२९)

DATE:- _____ / PAGE: _____

एकदा एक लहान मुलगा डोंगराच्या उंच आणि अरुंद कड्यावरून चालत होता. पायथ्याशी त्या खेड्यातली वयस्क मंडळी बसली होती. त्यातील एक गृहस्थ म्हणाले, खर तर त्यानी असे चालू नये. काहीच भिती वाटत नाही खाली पडण्याची.

त्यावर, दुसरे लगेच म्हणतात, "फार मोठी "रिक्स" घेतोय तो.

इथे त्यांना "रिस्क" म्हणायचं होतं.

अंगणात पाय घसरून पडलेल्या आजी, पाय खूप दुखतो म्हणून दवाखान्यात येतात. डाक्टर त्यांना X रे काढायला सांगतात. तो घेवून त्या डाक्टरांकडे येतात. म्हणतात डाक्टर, मला तर ह्या "एक्सेल" काहीच दिसत नाही. डाक्टर हसू लपवतात.

इथे त्यांना "X रे" म्हणायचं होतं.

दोघी मैत्रिणी आपसांत लिसरीबद्दल बोलत होत्या. पहिली म्हणते, लिचातर फारच तोरा आहे ग! उंचीउंची कपडे, दागिने, सँडल्स, गॉगल त्यावर विशेष भर होता. चर्चेत आणि एवढा पैसा कुठून येतो बर! सगळं नुसतं प्रदर्शन! लगेच दुसरी म्हणते, अगं आनी ~~ऑटिकारपोर्शनवाले मागे लागतील~~ "ऑटिकापोरेशन" वाले मागे लागतील तिच्याकडे.

इथे "अँटिकरप्शन" म्हणायचं होतं त्यांना!



सौ. उज्वला श्रीराम प्रभुणे
वृंदावन हाईट्स,
पुणे.

FOR EDUCATIONAL USE